# शिक्षणप्रक्रिया

शिक्षणातून बालकाच्या भावी जीवनाची तयारी व्हायची असते. या दृष्टिकोणातून पाहता, शिक्षण हे भाविकालाभिमुख असले पाहिजे. बालकाच्या भावीकालातील गरजांचा अंदाज करून, वेध घेऊन, त्या गरजांना पुरे पडू शकेल असा शिक्षणाचा आशय असावा लागेल. त्या अंदाज करण्यात, वेध घेण्यात अडचणी अनेक आहेत. नेमकेपणा तर अपेक्षिततताच येणार नाही. पण तरीही प्रयत्न सोडून चालणार नाही. कारण, शिक्षणाला भावीकाला व्यतिरिक्त अन्य दिशा असूच शकणार नाही. शिक्षण भूतकाळावर बेतून चालणार नाही ; ते बालकाच्या भावीकालातील जीवनविषयक गरज आणि शिक्षणाने करून दिलेली भूतकालाधारित तयारी यात फार मोठे अंतर निर्माण करील आणि अशा व्यक्तीचे जीवन विसंगतींनी भरून जाईल. शिक्षण त्याच्या दृष्टीने कालसुसंगत ठरणार नाही. म्हणजे शिक्षणात घालवलेला वेळ वाया गेला, असे होईल.

शिक्षण हे भाविकालाभिमुख असले पाहिजे, पण हे झाले शिक्षणाच्या आशयाबद्‍लचे. शिक्षणाचा आशय हा शिक्षणाचा हेतू सांगतो; 'शिक्षण' या शब्दाची-संज्ञेची व्याख्या सांगत नाही.

ज्याला आपण 'शिक्षण' म्हणायचे आहे ती एखादी ठोक गोष्ट नाही; ती वीजेप्रमाणे प्रवाही गोष्ट आहे. आणि तिचे नाव आहे 'शिक्षणा ची प्रक्रिया', 'शिक्षणप्रक्रिया'. शिक्षण होणे म्हणजे शिक्षणाच्या प्रक्रियेतून जाणे. नदीचे वाहते पाणी म्हणजे शिक्षणप्रक्रिया असेल तर त्यात मनसोक्त पोहणे म्हणजे शिक्षण होणे होय. आधी उथळ पाण्यात डुंबण्यापासून वाढत्या खोलवरच्या पाण्यात सूर मारणे म्हणजे ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेत खोल खोल शिरणे होय. रोज त्याच ठिकाणी पोहले तरी रोज आपण त्याच पाण्यात पोहत नसतो, नित्य नवीन पाण्याचा अनुभव घेत जातो. शिक्षणप्रवाहात शिरणाऱ्याच्या बाबतीत हेच घडते. नित्य नूतन अनुभव हेच शिक्षण असते. शिक्षणप्रक्रियेत असणे म्हणजेच शिक्षण होय.

शिक्षणप्रक्रियेतून जाणे म्हणजे शिक्षण, असे जरी असले तरी कोठवर जायचे नि कोणत्या दिशेने जायचे हे भावी कालातील अपेक्षित गरजांनी ठरवून द्यायचे असते. शिक्षणाच्या हेतूतून शिक्षणाची दिशा ठरविली जाते.

शिक्षणाची दिशा ही व्यक्तीविकासाची असते ती व्यक्तीअंतर्गत घटनांकडे अंगुलीनिर्देश करते. व्यक्तीअंतर्गत, भावी जीवनाला आवश्यक अशा कौशल्यांकडून कल्पक कृतिमयतेकडे आणि माहितीकडून ज्ञानप्राप्तीकडे त्यांची वाट जाते. भावीकालातील गरजांच्या पूर्तीसाठी माणसाची अशी तयारी घडून यायची असते. माणसांनी माणसांत वावरण्याची तयारी त्यातून व्हायची असते.

शिक्षणाचे भावी काळाशी असे घट्ट असे नाते बांधलेले असले तरी शिक्षणप्रक्रिया ही मात्र वर्तमान गोष्ट असते; ती वर्तमानाशी निगडित असते. ती वर्तमानातच घडायची असते. रोजच्या रोज शिक्षणाच्या प्रक्रियेत अनुभव घेत घेतच बालकाचे शिक्षण होत असते. शिक्षणप्रक्रियेत शिरण्याची संधी काही काल किंवा कधीही न मिळणे याचा अर्थ मुलाचे वर्तमानकालातील तेवढे दिवस फुकट जाणे होय. त्यामुळे सातत्याने शिक्षणप्रक्रियेत असणे महत्त्वाचे आहे. एवढेच नव्हे तर रोजच्या रोज शिक्षणप्रक्रियेत असणे हे, मुलाचा वर्तमानकाळ आनंददायक असल्याची ग्वाही देणारे आहे.

शिक्षणप्रक्रिया ही वर्तमानकालीन घटना असते, आणि शिक्षण होणे म्हणजे शिक्षणप्रक्रियेत असणे असे असेल तर शिक्षण होण्याची घटना फक्त वर्तमानातच होते असे म्हणता येईल. शिक्षणात असणारा विद्यार्थी, हा काल, शोध घेण्यात घालवत असतो . हा दुहेरी असतो. तो बाह्य घटना आणि तदनुषंगिक माहिती – ज्ञान - विश्लेषण यांचा शोध घेत असतो; आणि त्याच वेळी असा शोध घेण्याच्या आंतरिक क्षमतांचाही शोध तो घेत असतो. अर्थात् या दोन्ही शैक्षणिक प्रक्रिया एकाच वेळी आणि एकत्रच होत असतात.

शिक्षण होण्याची घटना फक्त वर्तमानकालातच घडून येत असेल तर ती घटना परिणामाकारक रीतीने होत आहे किंवा नाही याचे मूल्यमापनही फक्त वर्तमानकाळातच होऊ शकते. चार सहा महिन्यांनी किंवा वर्षभराने परीक्षा घेऊन वर्तमानकालीन प्रक्रियेचे मूल्यमापन करता येणे शक्य नसते. मूल्यमापन, विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेत असतानाच त्याच्या अवलोकनाने करता येते. अर्थात हे झाले बाह्य मूल्यमापन. विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत असतानाच स्वतःचे स्वतः मूल्यमापन करीत राहतो. कारण शिक्षणप्रक्रियेचाच तो एक अविभाज्य भाग असतो. शिक्षणप्रक्रियेचा परिचय, नंतर अनुभव व तदनंतर मूल्यमापन या तिन्ही क्रिया परस्परसंबंधित अशाच आहेत आणि त्या वर्तमानकालाशी निबद्ध आहेत.

❖